■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - ३०७ ■ शुक्रवार दि.२५ जुलै २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४
■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 307 ■ Friday Dt. 25 July 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# शिरूर तालुक्यातील आर्वीत बोगस मावेजा प्रकरण उघडकीस; शासनाची दुसऱ्यांदा लाखो रुपयांची फसवणूक?

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

**गट क्र.९२ प्रकरणाच्या फाईलची पुन्हा सखोल चौकशी होणे आवश्यक; दोषींवर तातडीने कारवाई करण्याची मागणी?**

# खऱ्या लाभार्थ्यांना वंचित ठेवून शासनाच्या तिजोरीवर डल्ला मारणाऱ्याला गजाआड करणे गरजेचे?

## मावेजा फसवणूक प्रकरणी कारवाई होणार की पाठीशी घालणार; जिल्हा प्रशासनाच्या भूमिकेकडे सगळ्यांचे लक्ष!

## दोषी सुटले तर प्रशासनही संशयाच्या भोवऱ्यात; कारवाईची वाट पाहणाऱ्यांचा सूर तीव्र?

बीड । प्रतिनिधी
शिरूर तालुक्यातील आर्वी गावात शासनाच्या मावेजा योजनेअंतर्गत मोठ्या प्रमाणात गैरप्रकार समोर आले आहेत. दुसऱ्यांदा बनावट कागदपत्रांच्या आधारे पुन्हा मावेजा घेतल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. यामुळे शासनाची लाखो रुपयांची फसवणूक झाल्याची शक्यता व्यक्त होत आहे. या प्रकरणी महसूल प्रशासन आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या कार्यप्रणालीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत. एवढेच नाही तर काही दलालांच्या संगनमतातून हे गैरप्रकार घडल्याची देखील शक्यता आहे. सदर प्रकरणाची सखोल चौकशी होणे गरजेचे असून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. गेल्या काही काळात अशा प्रकारच्या फसवणुकीचे प्रमाण वाढत असून शासनाच्या योजनांचा गैरवापर करून सरकारी तिजोरीवर गंडा घालणाऱ्यांवर तात्काळ कारवाई होणे गरजेचे आहे. संबंधित प्रकरणाची चौकशी करून दोषींना कठोर शिक्षा न दिल्यास असे प्रकार पुन्हा पुन्हा घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, आर्वी गावातील गट क्रमांक ९२ मध्ये मोठा गैरप्रकार उघडकीस आला आहे. तीन शेतकऱ्यांसह गावाशी काहीही संबंध नसलेल्या मच्छिंद्र रामभाऊ या व्यक्तीने उजवा कालवा मावेजाच्या नावाखाली तब्बल १२ लाख १७ हजार रुपये उचलल्याचे समोर आले आहे. विशेष म्हणजे संबंधित गटामध्ये या व्यक्तीचे नाव नाही, तरीही बोगस कागदपत्रांच्या आधारे मावेजा उचलण्यात आला. या प्रकारामुळे शासनाची मोठी आर्थिक फसवणूक झाली असून, महसूल विभाग व संबंधित अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. गट क्रमांक ९२ मध्ये यापूर्वीच बोगस मावेजा उचललेल्या व्यक्तींनी आता पुन्हा एकदा राष्ट्रीय महामार्ग ६१ लगत असलेल्या याच जमिनीवर मावेजा मिळवण्याचा खटाटोप सुरू केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या प्रकारामुळे शासनाची पुन्हा फसवणूक होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. याप्रकरणी संबंधित व्यक्तींविरोधात सखोल चौकशी करून तात्काळ कडक कारवाई करण्यात यावी, अशी जोरदार मागणी

पान २ वर



## केज तालुक्यात मटका बुक्कीवर छापे

### २४ हजारांचा मुद्देमाल जप्त; चौघांना विरोधात केस पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

केज । प्रतिनिधी
केज पोलिसांनी केज शहर आणि नांदूर घाट येथे मटका बुक्यावर छापे मारून मटका घेणाऱ्या चौघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून नगदी रक्कम व दोन मोबाईल असा एकूण २४ हजार २९० रु चा मुद्देमाल जप्त केला. केज पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे साहेब यांच्या आदेशावरून फौजदार सुकुमार बनसोडे, सहाय्यक फौजदार प्रल्हाद चव्हाण, पोलिस नाईक प्रकाश मुंडे यांच्या पथकाने २२ जुलै रोजी दुपारी शहरातील



कानडी रस्त्यावरील लोकचपीर भागात छापा मारून गैबुद्दीन अहमद शेख यास मटका घेताना पकडले. त्याच्याकडून नगदी २ हजार ६६० रुपये व ८ हजाराचा मोबाईल जप्त करण्यात आला. तसेच कानडी चौकात शिवाजी श्रीमंत कांबळे रा.

पान २ वर

## गायरान धारकांचे तीव्र आंदोलन होणार : युवा प्रदेशाध्यक्ष धम्मपाल कांडेकर

गेवराई । प्रतिनिधी
गेवराई तालुक्यातील तसेच गेवराई शहरातील गायरान धारकांची व्यापक बैठकीचे आयोजन पॅंथर्स रिपाइं चे युवा प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष धम्मपाल कांडेकर यांच्या अध्यक्षतेखालील संपन्न झाली. या वेळी बैठकीत बोलताना युवा प्रदेशाध्यक्ष धम्मपाल कांडेकर म्हणाले की, राज्यात तसेच गेवराई तालुक्यातील गायरान प्रश्नी मोठ्या स्वरुपाचे आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला. शासनाच्या २८/११/१९९१ च्या जि आर ची अमलबजावणी करण्यात यावी तसेच गेवराई तालुक्यातील

पान २ वर



## घाटनांदूर ते नवाबवाडी रस्त्यावर अपघातांचे सत्र सुरूच; नागरिक त्रस्त

घाटनांदूर । प्रतिनिधी
अंबाजोगाई तालुक्यातील घाटनांदूर ते नवाबवाडी रस्त्याची दुरवस्था केवळ गैरसोयीची बाब राहिलेली नसून, ती आता अपघातांचे मुख्य कारण बनली आहे. सततच्या पावसाच्या हजेरी मुळे रस्ता चिखलमय आणि घसरडा झाला असून, खड्डे, अपूर्ण काम आणि रस्त्याचा नितांत गरज असलेला दर्जा यामुळे अपघातांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.



पावसाची हजेरी सुरू होताच घाटनांदूर ते नवाबवाडी दरम्यानचा रस्ता चिखलमय होऊन धोकादायक ठरत आहे. रस्त्यावरील खोल खड्डे, घसरट माती व पाणी साचल्याने ते पडलेले खड्डे अदृश्य झाल्याने वाहनचालकांचे नियंत्रण सुटण्याचे प्रकार वाढले आहेत. परिणामी, अपघातांचे प्रमाण झपाट्याने वाढले आहे. गेल्या काही दिवसांत अनेक दुचाकीस्वार या रस्त्यावर घसरून जखमी झाले आहेत. विशेषतः शालेय विद्यार्थी, वृद्ध नागरिक आणि महिलांना या मार्गाने प्रवास करताना मोठा धोका निर्माण होत आहे. त्यामुळे गावकऱ्यांच्या मनात संतापाची लाट निर्माण झाली आहे.
प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करूनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही, अशी तक्रार स्थानिक नागरिक व गावकरी व्यक्त करत आहेत. दळणवळणासाठी नवाबवाडी व मुरंबी या दोन गावच्या नागरिकांना हा मुख्य रस्ता आहे. हे संबंधित यंत्रणांनी समजून घेता. तत्काळ रस्त्याची डागडुजी आणि सडका मार्ग सुस्थितीत आणण्यात यावी, अशी मागणी संबंधित कंत्राटदार व प्रशासन यांच्याकडे ग्रामस्थांकडून केली जात आहे. आणि तत्काळ तसे झाले नाही तर संबंधित यंत्रणांना, कंत्राटदार व प्रशासन यांच्या विरोधात गावकऱ्यांकडून आंदोलनाचा इशारा दिला गेला आहे.

## खा.बजरंग सोनवणे यांच्याकडून महामार्ग, रेल्वेमार्गासाठी सतत पाठपुरावा; केंद्रीय मंत्र्यांची भेट घेवून मांडले प्रश्न

केज । प्रतिनिधी
बीडजिल्ह्यातील विविध राष्ट्रीय महामार्गाचे काम तातडीने पुर्ण करावेत, महामार्ग कामे करीत असताना जिथे-जिथे तांत्रिक दोष झालेले आहेत ते दुरुस्त करावेत भेगा पडलेल्या महामार्गांची दुरूस्ती करावी, अशा विविध मागण्यांसाठी खा. बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची दिल्लीत भेट घेतली. यावेळी सततचा पाठ पुरावा पाहून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी पाठ थोपटली. तर जिल्ह्यातील रेल्वेच्या संदर्भात केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेवून रेल्वे संदर्भातील विषयावर चर्चा केली. यावेळी मंत्री अश्विनी वैष्णव यांनी रेल्वेसंदर्भाने मांडलेल्या सर्व मागण्यांबाबत सकारात्कता दर्शवली.
दि.२४ जुलै रोजी खा. बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री



नितीन गडकरी यांच्या कार्यालयात त्यांची भेट घेतली. यावेळी शेगाव- पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग मधील परतूर- माजलगाव बिटमधील सादोळा ता.माजलगाव येथील अपूर्ण असलेली सर्व कामे तातडीने पूर्ण करण्याची मागणी केली माजलगाव-केज बिट मधील नादुरुस्तभागांची दुरुस्ती व तांत्रिक दोष दूर करण्याबाबत निर्देश द्यावेत, धारूर घाटातील प्रस्तावित वळण मार्गाचे काम तसेच बर्दापूर- लोखंडी सावरगाव चौपदरीकरणाचे काम लवकरात लवकर सुरू करावे, केज-कळंब मधील मांजरानदीवरील पुलाच्या कामासंदर्भात निर्माण झालेल्या अडचणी दूर करून काम पूर्ण करावे, पैठण-पंढरपूर रस्ता व अहमदपूर-मांजरसुंबा-पाटोदा या रस्त्यांवरील समस्या तातडीने सोडवाव्यात व प्रस्तावित अतिरिक्त बाबींना मंजुरी देण्यात यावी. छत्रपती संभाजीनगर-बीड- सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील गेवराई तालुक्यातील गढी येथील उड्डाणपुल व रस्ता हा विभागाच्या तांत्रिक दोषामुळे अपघात होऊन ६ युवकांचा दुर्दैवी मृत्यू ओढवला. या तांत्रिक दोषाची

पान २ वर

बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी महामार्ग, रेल्वेचे कामे होणे अत्यंत महत्त्वाचे असून, केंद्रीय मंत्री ना. नितीन गडकरीसाहेब यांनी वैयक्तिक लक्ष देतो, असा शब्द दिला आहे. तर रेल्वेमंत्र्यांनी मागण्यासंदर्भात सकारात्मक प्रतिसाद दिलेला आहे. या प्रकल्पांची अंमल बजावणी लवकरात लवकर होण्यासाठी माझ्याकडून सातत्याने पाठपुरावा केला जाईल.
— **खा.बजरंग सोनवणे,** बीड लोकसभा मतदार संघ.

### सादोळाकरांची मागणी केंद्रीय मंत्र्यांपुढे मांडली

शेगाव-पंढरपूर राष्ट्रीय महामार्गामधील परतूर- माजलगाव बिटमधील सादोळा ता.माजलगाव येथे पुल आणि रस्त्याचे काम अपुर्ण आहे. याठिकाणी जमीनी वरून ही वादविवाद निर्माण झालेले आहेत. यामुळे काम अपूर्ण असून यावर योग्य तो मार्ग काढून तेथील काम पूर्ण करावे, यासाठी मागील काही दिवसां पुर्वी सादोळाकरांनी उपोषण केले होते. यानंतर दि.२४ जुलै रोजी खा.सोनवणे यांनी सादोळाकरांचा प्रश्न थेट केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यापुढे ठेवला. रस्त्यासंदर्भात जनभावना लक्षात घेवून तो प्रश्न तातडीने सोडवू, असे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी म्हणाले.

# शेतकऱ्यांचा ७/१२ कोरा झालाच पाहिजे

## शेतकरी कर्जमाफीसाठी मेंढ पाळा सहित माजलगाव मध्ये चक्काजाम आंदोलन

माजलगाव । प्रतिनिधी
प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक अध्यक्ष बच्चुभाऊ कडू यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र मध्ये चक्काजाम आंदोलन करण्यात आले. माजलगाव तालुक्यातील वसंतराव नाईक चौक परभणी फाटा येथे साकळी ११:३० वाजता चक्काजाम आंदोलनास सुरवात करण्यात आली हे आंदोलन दोन तास चालू होते या आंदोलनात शेतकरी तसेच दिंव्याग बाधव, मेंढ्या सहित मेंढपाळ मालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



गेल्या काही महिन्यापासून प्रहार चे संस्थापक अध्यक्ष बच्चुभाऊ कडू यांनी शेतकरी सातबारा कोरा करण्यासाठी कर्जमाफीची मागणी शासनाकडे केली आहे. त्यासाठी त्यांनी आमरण उपोषणही केले नंतर पदयात्रा काढली आता कर्जमाफी बाबत प्रत्येकाने आवाज उठवणे गरजेचे असल्याने आंदोलनाच्या पुढील टप्पा म्हणून २४ जुलै रोजी राज्यभर चक्काजाम आंदोलन करण्यात आले आंदोलनात कोणत्याही पक्षाचा झेंडा नाही केवळ शेतकरी, दिव्यांग, मेढपाळ, मछीमार, कर्मचारी यांच्या विविध प्रश्नासाठी व एकत्र येऊन शासनाकडे कर्जमाफीची मागणी जोर कस पणे मांडण्यासाठी दोन तास चक्काजाम आंदोलन केले आहे.

या आंदोलनामध्ये शेतकरी संघटनेचे नेते भाई गांगभिषण थावरे, शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई नारायण गोले पाटील, काँग्रेसचे तालुकाप्रमुख नारायण होके पाटील, आझाद क्रांती सेनेचे संस्थापक अध्यक्ष राजेश घोडे, मौलाना आझाद युवा मंचचे जिल्हाध्यक्ष नुमान अली चाऊस, शेतकरी क्रांती सेनेचे योगेश कानडे, वीर शंभू संघटनेचे गणेश शिंदे, पदाधिकारी तसेच आजी माजी सैनिक संघटनांनी मा.वसंतराव नाईक चौक परभणी फाटा माजलगाव येथे येऊन चक्काजाम आंदोलनात सहभागी होऊन जाहीर पाठिंबा दिला हे आंदोलन माजलगाव प्रहार जनशक्तीचे तालुका अध्यक्ष गोपाळ पैजणे, नितीन कांबळे, भारत डोंगरे हरिचंद्र जाधव विजय जोगडे अशोक अर्जुन लक्ष्मण गरड, विकास जगताप, विलास लवाळे, श्रीराम कोरडे, युवराज राठोड, महादेव डाके, पांडुरंग कुकडे, गणेश नागणे, अनेक शेतकरी व दिव्यांग बांधव पदाधिकारी उपस्थित होते.

# सामाजिक कार्यकर्त्याने वृतपत्रातील बातमी सोशल मीडियावर शेअर केल्याने बातमीतील सबंधिताच्या नातेवाईकाकडुन शिविगाळ

तलवाडा । प्रतिनिधी
गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील पोलीस स्टेशनच्या हाद्दीत काही दिवसापुर्वी शाळकरी मुलींची रस्त्यात आडऊन छेड काढण्यात आली होती. मुलींच्या पालकांनी व मुलींनी तलवाडा पोलीस स्टेशनला या बाबतीत माहिती देत संबधित छेड काढणाऱ्या मुलांच्या विरोधात गुन्हा दाखल केला होता. पोलीस स्टेशन मध्ये दाखल केलेल्या एफ आर च्या प्रेसनोट प्रमाणे संबधित घटनेच्या आणुषंगाने वृतपत्रात सविस्तर बातम्या प्रकाशित झाल्या होत्या.
इतरत्र पालकांनी आप आपल्या पाल्यांची काळजी व दक्षता घ्यावी या सोजळ भावनेतुन सामाजिक बांधिलकी म्हणून स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उप युवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन यांनी या बातम्या सोशल मीडियावर शेअर केल्या होत्या. याचा राग मनात धरून घटनेशी सबंधित आसलेल्या मुलांच्या एका नातेवाईक हितचिंतकाने घटनेचे गांभीर्य लक्षात न घेता ऊलट छेड काढणाऱ्या मुलांचे उघड उघड समर्थन करत सोशल मीडियावरील बातम्या डिलीट कराव्यात या हेतुने स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उप युवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन यांना इस्टाग्राम या सोशल मीडियावरुन आर्वच्छ भाषेत शिविगाळ केल्याने शेख खिजर जैनोदीन यांनी दिनांक २४/०७/२०२५ रोजी पोलीस स्टेशन तलवाडा येथे ज्ञानेश्वर पालवे रा. वंजारवाडी (रायमोह) याने आरोपीचे समर्थन करुन बातम्या डिलीट करण्या संदर्भात म्हणणाऱ्या तरुणा विरोधात फिर्याद दिली असुन तलवाडा पोलीसांनी कलम १७४ बी. एन. एस अंतर्गत गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास तलवाडा पोलीस करीत आहे.

# हरिश्चंद्र पिंपरी तांडा येथील जिल्हा परिषद शाळेची पडझड, स्थानिक शिक्षण विभागाच दुर्लक्ष

## इमारती लगतच विद्यार्थी घेतात शिक्षण, इमारतीपासून विद्यार्थ्याला धोका : दत्ता चव्हाण, शरद राठोड

वडवणी । प्रतिनिधी
वडवणी तालुक्यातील राजा हरिश्चंद्र पिंपरी तांडा येथील जिल्हा परिषद शाळेची इमारत, या ठिकाणी या शाळेमध्ये पहिली ते चौथी या वर्गाचे पर्यंतचे विद्यार्थी शिक्षण घेतात सदरील शाळेची जुनी इमारत डबघाईला आलेली आहे, येथील ग्रामस्थांनी अनेक वेळा निवेदन देऊनही सुद्धा याच्याकडे प्रशासनाने लक्ष दिले नाही. सदर इमारत खूप वर्षापासूनची आहे आणि ती शाळेच्या लगतच ती इमारत सध्या जीर्ण झालेली आहे.



इमारती लगतच विद्यार्थी त्या ठिकाणी शिक्षण घेत आहेत, कधी पण इमारत ढासळू शकते, ग्रामस्थांनी अनेक वेळा निवेदन देऊन सुद्धा याची दखल घेतली जात नाही. यावेळी येथील शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शरद सुखदेव राठोड व ग्रामपंचायत सदस्य, उपाध्यक्ष विकास पवार मुख्याध्यापक मुळे सर, अर्जुन राठोड, सुरेश चव्हाण, बाळू राठोड, सुनील राठोड, रमेश चव्हाण, वारंवार निवेदन देऊनही स्थानिक चे सरपंच यांनी सातत्याने पाठपुरावा करूनही, स्थानिक शिक्षण विभाग दुर्लक्ष करीत आहे, त्यामुळे पालक येणाऱ्या काळात आमरण उपोषण करण्याचा इशारा संबंधित पालकांनी दिला आहे.

# श्रावण मासानिमित्त भालचंद्र गणपती मंदिरांची भक्तांकडून स्वच्छता मोहीम; विना उभारण्यात आला : डॉ.ढवळे

लिंबागणेश । प्रतिनिधी
श्रावण महिना अध्यात्माचा, मन:शुद्धीचा पावित्र्याचा आणि व्रतवैकल्याचा संस्कृतीचे मोठे महत्त्व म्हणून ओळखला जातो. ऊन पावसाचा लपंडाव खेळणारा, इंद्रधनुष्याची कमान बांधणारा, हिरवाईचा गालिचा अंथरुणारा व्रतवैकल्याने सात्विकतेचा सडा शिंपणारा, निसर्गाची समृद्धी उधळणारा श्रावण महिना आज दि.२५ शुक्रवार पासुन सुरु झाला असुन २३ आगस्ट पर्यंत श्रावणाचा बहर सुरू राहणार आहे. सण उत्सव, व्रतवैकल्याची मांदियाळी घेऊन आलेल्या या हिरव्या ऋतुच्या स्वागतासाठी प्रत्येक जण आतुर झाला आहे. धार्मिक विधी, सण यांची रेलचेल असल्याने सर्वत्र उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.
आपल्या संस्कृतीत या महिन्याला अनन्यसाधारण महत्त्व असुन यानिमित्ताने महादेव मंदिरासह सर्वच मंदिरांमध्ये भाविकांची दर्शनासाठी, पुजा, अर्चा करण्यासाठी गर्दी होते. आपण नतमस्तक होणारा परीसर स्वच्छ



असायला हवा यासाठी श्रावण महिन्यात गावातील सर्वच मंदिरांची स्वच्छता करताना पहावयास मिळते. मंदिराच्या स्वच्छतेसाठी भाविक, तरूण मंडळी, वारकरी सगळेच आघाडीवर असतात.
आज बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील श्रीक्षेत्र भालचंद्र गणपती मंदिर, हनुमान मंदिर, खंडोबा मंदिर, श्रीकृष्ण मंदिर आदी मंदिराची स्वच्छता करण्यात आली. स्वच्छता मोहीमेत दगडु कांबळे, गणपत दाभाडे, कल्याण वाणी, शिवाजी वाणी, वरद जोशी, अभिजित गायकवाड, सुरज भोसले, अक्षय आबदार, रोहित भोसले कमलाकर जाधव, सचिन भोसले, विवेक भोसले, हरिओम क्षीरसागर आदि सहभागी झाले होते.
श्रीक्षेत्र भालचंद्र गणपती मंदिरात परंपरागत विना उभारण्यात आला प्रति वर्षाप्रमाणे लिंबागणेश येथील श्रीक्षेत्र भालचंद्र गणपती मंदिरात परंपरागत विना उभारण्यात आला. सर्वप्रथम भजणी मंडळी व भाविकांच्या उपस्थितीत गणपती पुजन, नवग्रह पुजन व ग्रंथराज पुजन करून विना उभारण्यात आला.यावेळी देवस्थान विश्वस्त, पुजारी आणि भाविक मंडळी उपस्थित होती. महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

पान १ वरून...

## बोगस लाभार्थ्यांनी शासनाला लुटले

स्थानिकांकडून होत आहे. प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देणे अत्यंत आवश्यक ठरत आहे. तसेच खरवंडी–राजुरी–लोहा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ मध्ये रस्तालगतची साडेसात गुंठे जमीन गेली असे दाखवून पुन्हा एकदा मावेजा हडपण्याचा प्रयत्न केल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकारामुळे शासनाची मोठी दिशाभूल झाली असून यामागे कोणत्या अधिकाऱ्यांची मिलीभगत आहे, याबाबतही संशय व्यक्त होत आहे. सततच्या फसवणुकीमुळे प्रशासनाची विश्वासार्हता डळमळीत होत असून, याप्रकरणी तात्काळ सखोल चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची जोरदार मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे.

## केज तालुक्यात मटका बुक्कीवर छापे

प्रशांत नगर यास मटका घेताना पकडून त्याच्याकडून १ हजार ५१० रुपये व ८ हजाराचा मोबाईल जप्त केला. मंगळवार पेठ चौकात सचिन गंगाराम रोडे रा. शनिमंदिर जवळ केज, यास मटका घेताना पकडून त्याच्याकडून २ हजार १६० रु जप्त केले. तर सहाय्यक फौजदार राजु वाघमारे, जमादार राजू वंजारे, उमेश आघाव, रशीद शेख यांनी नंदुरघाट येथील बाजार तळावर छापा टाकून अशोक संदीपान ढाकणे रा. ढाकणवाडी यास मटका घेताना पकडून १ हजार ९६० रु जप्त केले. वरील चौघांविरोधात केज पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद असून या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

## गायरान धारकांचे तीव्र आंदोलन होणार : युवा प्रदेशाध्यक्ष धम्मपाल कांडेकर

गायरान धारकांना घरकुल देण्यात यावे गायरान धारकांचे पिक पंचनामे करण्यात यावे या सह विविध विषयावर या बैठकीत चर्चा करण्यात आली या वेळी गायरान धारकांनीही आपले आपले मत व्यक्त केले.
या बैठकीला गायरान धारक सोनाबाई कांडेकर, सोनाबाई सौंदरमल, सुबाबाई वक्ते, जयश्री मनोहर नाडे, आई पाटोळे, आई युवा नेते धम्मपाल भोले, योगीराज शिंदे, सुरेश कांडेकर, सुनिल कांडेकर, डि यु कांडेकर, यमराज सौंदरमल, भांगे दादा, विजय सांळुखे, ईमरान भाई, सुरेश कारके, जाधव मामा, संतोष बांगर, सुभाष सौंदरमल, गोपीनाथ भोले, सोमनाथ पाटोळे, बाबुराव कांबळे, आकाश जाधव, रामभाऊ भोले, अजहर भई, कृष्णा भालेराव, बंन्डु शिंदे, सुधाकर केदार, माटे मामा, बाबुराव साबळे, बाबा दाभाडे, कारके दादा, सिराज भाई, तुरुकमारे दादा यांच्यासह पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते तर या बैठकीचे आभार प्रदर्शन बाबुराव साबळे यांनी मानले.

## खा.बजरंग सोनवणे यांच्याकडून महामार्ग, रेल्वेमार्गासाठी सतत पाठपुरावा

जबाबदारी निश्चित करण्यात यावी. मयतांच्या कुटूंबियांना मदत करण्यात यावी, अशी आग्रही मागणी केली. या सर्व मुद्द्यांकडे ना.नितीन गडकरी यांनी वैयक्तिक लक्ष घालण्याचे आश्वासन दिले व उर्वरित कामे तातडीने पूर्ण करण्यासाठी संबंधितांना सूचना दिल्या.याच वेळी 'तुमचा बीड जिल्ह्याच्या विकासासाठीचा पाठपुरावा आणि धडपड चांगली आहे', अशा शब्दात पाठीवर थाप देवून कौतूक केले. यानंतर रेल्वे मंत्री ना. अश्विनी वैष्णव यांची त्यांच्या संसदभवन कार्यालयामधे खा. बजरंग सोनवणे यांनी भेट घेतली.
यावेळी, आहिल्यानगर–बीड–परळी रेल्वे प्रकल्पा अंतर्गत प्रस्तावित १० रोड ओव्हर ब्रिज व ढोलेवस्ती (बीड) रोड अंडरपासचे कामत्वरीत सुरू करण्यात यावे. बार्शीनाका (बीड शहर) रेल्वे स्टेशनवर प्रवासी संख्येच्या प्राथमिकते च्या आधारे थांबा देण्यास मंजुरी देणे, अंबाजोगाई तालुक्यातील घाटनांदूर रेल्वे स्टेशनवर रेल्वे गाड्यांना थांबा देण्याचा प्रस्ताव मंजूर करून आदेश त्वरित निर्गमित करणे, बीड–आहिल्या नगर–सीएसटी (मुंबई) अशी नियमीत रेल्वेसेवा लवकर सुरू करावी, अशी मागणी केली. यावेळी मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सकारात्मकता दाखवित मागण्यां संदर्भात कार्यवाही करण्याचा शब्द दिला.

# लिंबराज गायकवाड यांची 'प्रकाशपर्व न्युज'च्या कार्यकारी संपादकपदी नियुक्ती



केज । प्रतिनिधी
आवाज वंचित बहुजन समाजाचा' या ब्रीदवाक्याने समाजातील दबलेल्या, उपेक्षित घटकांचे प्रश्न प्रभावीपणे मांडणाऱ्या प्रकाशपर्व न्युज या माध्यम संस्थेच्या कार्यकारी संपादकपदी लिंबराज शंकरराव गायकवाड यांची नियुक्ती करण्यात आली आहे.
सामाजिक भान, स्पष्ट भूमिका, आणि पत्रकारितेतील सक्रिय सहभाग यामुळे लिंबराज शंकरराव गायकवाड यांची ही निवड प्रकाशपर्व न्युजसाठी निर्णायक ठरणार आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली प्रकाशपर्व न्युज नक्कीच नवीन उंची गाठेल, असा विश्वास संस्थेच्या संपादकीय व व्यवस्थापन विभागाने व्यक्त केला आहे. या नियुक्तीबद्दल प्रकाशपर्व न्युज परिवारातर्फे मा. लिंबराज गायकवाड साहेबांना पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या आहेत. नवीन जबाबदारी स्वीकारताना लिंबराज गायकवाड यांनी समाजातील वंचित घटकांचा आवाज बुलंद करण्याची आणि लोकशाही मूल्यांशी निष्ठा ठेवत निडर पत्रकारिता करण्याची ग्वाही दिली.

# गेवराई शिक्षक पतसंस्थेचे शामराव कुलकर्णी यांची सेवानिवृत्ती

**संघर्षमय जीवनातून मार्ग क्रमन**
अनेक वर्ष नोकरी केल्यानंतर आपल्या प्रत्येकाच्या आयुष्यात न टाळता येणार क्षण म्हणजे 'सेवानिवृत्ती 'हा होय. शासकीय सेवा असो, सहकारी संस्था किंवा कोणत्याही क्षेत्रात काम करताना एका ठराविक वयात आपण कार्यमुक्त होत असतो, या सेवानिवृत्तीच्या आनंद सेवानिवृत्त धारकांच्या घरातील परिवारा बरोबरच ज्या संस्थेत आपण काम करत आहोत तेथील आपल्या सहकारी व्यक्तीने होत असतो, फरक एवढाच असतो की, त्यामागील कारणे हे भिन्न असतात. याला अपवाद म्हणजे, गेवराई तालुका शिक्षक सहकारी पतसंस्थेचे व्यवस्थापकीय संचालक शामसुंदर लक्ष्मीकांत कुलकर्णी हे होय.
अनेक वर्षाच्या दैनंदिन कामकाजाच्या ओढाताणातून ३१ जुलै रोजी सेवानिवृत्त होत आहेत. सेवानिवृत्तीचा आनंद त्यांच्या धर्मपत्नी सौ शुभदा व कन्या श्रद्धा यांना जास्त झाला परंतु अनेक वर्ष संस्थेच्या हिताचे निर्णय घेऊन संस्था नावारुपाला आणून त्यांच्या समवेत काम करणारे सहकारी संस्थेचे संचालक व सभासदांना २४ तास उपलब्ध असलेली श्यामसुंदर कुलकर्णी हे एटीएम मशीन होते ते आता आपणास वापरता येणार नसल्याची खंत अनेकांनी व्यक्त केली.
शामराव कुलकर्णी चकलांबा तालुका गेवराई या ग्रामीण भागातील एक कष्टाळू प्रामाणिक हुशार कुशाग्र बुद्धीचा व्यक्तिमत्त्व घरची आर्थिक परिस्थिती नाजूक असतानाही शिक्षणाची कास त्यांनी सोडले नाही, महाविद्यालय शिक्षण घेण्यासाठी बीड येथे जाण्यासाठी त्यांचे मामा कै.श्री.आत्माराम सुलाखे यांनी त्यांना मदत केली मित्र संतोष पारगावकर, सतीश सुलाखे यांचे तसेच अनेकांच्या सहकार्याने, घरातील कुटुंबाच्या सदिच्छा ने त्यांनी आपले पदवीधर शिक्षण पूर्ण केले.त्यासाठी त्यांनी अपार कष्ट सहन केले. शालेय शिक्षण चालू असतानाही फावल्या वेळात रात्रपाळीत काम करून शिक्षण पूर्णत्वाकडे नेणे. महाविद्यालय शिक्षणाबरोबरच वेदशास्त्र शिक्षण हे पण त्यांनी आत्मसात केले. चकलंबा येथील दीडशे वर्षाची परंपरा असलेल्या श्री रोकडेश्वर प्रासादिक नाट्य मंडळात ते सक्रिय कलाकार म्हणून आजही सहभागी असतात, नोकरीच्या दैनंदिन कामाच्या व्यापाने वेदशास्त्र शिक्षणाचा त्यांनी आपल्या आर्थिक प्राप्तीसाठी उपयोग करता आला नाही परंतु सतत धडपड करण्याची काहीतरी नवीन शिक्षण घेण्याची त्यांची जिद्द होती.



आर्थिक क्षेत्रात भारतात सर्वात सुरक्षित असलेली एकमेव संस्था म्हणजे एलआयसी होय. लोकांची फसवणूक होऊ नये, त्यांना त्यांचे योग्य मोबदला मिळावा, म्हणून नोकरीबरोबरच फावल्या वेळात एलआयसी प्रतिनिधी म्हणून त्यांनी काम केले, या कामात त्यांना अनेक पुरस्कारही मिळाले, पॉलिसी धारकांना त्यांच्या वेळेत गरजेनुसार योग्य मोबदला मिळवून देण्याची सेवा त्यांनी आज अखेरही चालू ठेवली आहे. गेवराई तालुका शिक्षक पतसंस्थे मध्ये ३७ वर्ष कार्यरत असताना अनेक कडू गोड अनुभव आले परंतु समर्थपणे व तितकेच प्रामाणिकपणे काम करत असल्याने संस्थेचे सर्व संचालक मंडळ चेअरमन, व्हाईस चेअरमन व सचिव सभासदांनी त्यांचे कौतुक केले त्यांच्या ३७ वर्षातील सेवेत अनेक पंचवार्षिक निवडणुका झाल्या अनेक जुने नवे संचालक निवडून आले, त्यांच्या समावेत असलेल्या सर्वच कर्मचारी वृंदानी कोणत्याही गटाची बाजू न घेता प्रामाणिकपणे काम करत राहिले. कधीच राजकारणात भाग घेतला नसल्याने एक निष्कलंकित सेवाभावी वृत्तीचा कार्यकारी संचालक संस्थेत लाभल्याबद्दल अनेक संचालकांनी त्यांचे कौतुक केले संस्थेच्या प्रगतीसाठी नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करत संगणकीय तंत्रज्ञानाचा वापर करत अल्प वेळात कर्ज मंजुरी तितक्याच तात्परतेने कर्ज वसुलीसाठी धडपड करणारे सर्वच सहकारी संस्थेचे संचालक यांच्या सर्वांच्या सहकार्याने संस्थेचा आज नावलौकिक आहे आज बीड जिल्ह्यातील एक आदर्श शिक्षकांची पतसंस्था म्हणून संस्थेचे नाव जिल्ह्यात अग्रक्रमाने घेतले जात आहे.
संस्था आज आपल्या स्वमालकीच्या वास्तूमध्ये काम करत आहे त्याकरिता संस्थेचे आज अखेरचे सर्वच आजी–माजी संचालक मंडळाचे,समवेत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे तसेच सभासदांचे मोठे योगदान असल्याचे कुलकर्णी यांनी सांगितले,संस्थेचे भाग भांडवल २४ कोटी रु असून कर्ज वाटप ५० कोटी रु आहे ठेवी २६ कोटी रु आहेत व वार्षिक उलाढाल १ अब्ज १७ कोटी रुपये आहे सभासदां व्यतिरिक्त सेवानिवृत्त शिक्षकांच्या ठेवी संस्थेत मोठ्या प्रमाणात आहे, हे संस्थेच्या विश्वासाचे प्रतीक च आहे, संस्थेसाठी केव्हाही उपलब्ध असलेले शामराव कुलकर्णी यांच्या सुखी जीवनात महाभयंकर संकट त्यांच्या आयुष्यात आले. आयुष्यभर केलेले कष्ट गरिबी शी केलेला सामना, आर्थिक संकटाला मात करत भाऊ–बहीण आई वडील यांच्याकडे जबाबदारी लक्ष देऊन संसाराचा गाडा हाकत असताना,त्यांच्यावर काळाने मोठा आघात केला, त्यांचा एकुलता एक तरुण होतकरू मुलगा गौरव याची त्याच्या १९ व्या वर्षी काही समाजकंटकांनी निर्गुण हत्या केली. आज ते ३१ जुलै रोजी सेवानिवृत्त होत असले तरी मनाने मुलाच्या निर्गुण हत्येच्या दिवशी त्यांच्या मनाने सेवानिवृत्ती घेतली होती केवळ घरात बसून रडत बसण्यापेक्षा घेतलेला वासा सोडायचा नाही मुलगी हीच मुलगा समजून तिच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहणारे शामराव कुलकर्णी उर्वरित आयुष्य आनंदी घालवायचे असे जरी सांगत असते तरी मनाशी दुःख ठेवून ते सतत कार्यरत आहेत.
उमरखेड येथील चिन्मयानंद संस्थेचे मठाधिपती माधवानंद महाराज यांच्यावर त्यांची मनोभावे श्रद्धा आहे. अनेक वर्षापासून प्रत्येक एकादशीला गेवराई येथून भक्त मंडळासह उमरखेड येथे दर्शनाला जात असतात. त्याचप्रमाणे अनेक वर्षापासून पायी दिंडीत ही जात आहे या सर्व उपक्रमांमध्ये शामराव कुलकर्णी सहभागी असतात. त्यांच्या या सेवानिवृत्तीच्या काळानंतरही त्यांचे सर्व आयुष्य सुखाचे तसेच झालेल्या ह्या दुःखातून सावरण्यासाठी बल द्यावे हीच त्यांना सेवानिवृत्तीच्या निमित्ताने गुरुचरणी आपणा सर्वांची प्रार्थना आहे

**मेश देशपांडे**
अहिल्यानगर ९४२३७९३२२६



# गेवराई येथील जमादारचा जिर्ण पूल बनला धोकादायक

## जुना पूल वाहतुकीस अडथळा, बांधकाम विभागाने दुरुस्ती करण्याची आवश्यकता

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील बीड –जालना रोडवर असलेला जमादार नावाचा पूर्वज काळापासून असलेला पुलाची जीर्ण व पुलांची स्थिती धोकादायक आहे. गेवराई तालुक्यातील जमादार पुल दुर्घटनेसारखी पुनरावृत्ती होऊ नये म्हणून बीड जिल्ह्यातील धोकादायक पुलांची तांत्रिक तपासणी करण्याचे आदेश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी संबंधित विभागाला द्यायला हवं. जे पूल धोकादायक आहेत अशा पुलांची दुरुस्ती पावसाळ्यापूर्वी करावी लागणार आहे. नादुरुस्त पुलांवरील सुरक्षित कठडे मोडकळीस आल्याने प्रवाशांच्या जीवाला धोका निर्माण झालेला आहे. जमादार पुलाची धोकादायक स्थिती म्हणजे पूल वापरासाठी सुरक्षित नाही आणि त्यावरुन प्रवास करणे धोकादायक आहे. अशा पुलांची दुरुस्ती किंवा पुनर्बांधणी करणे आवश्यक असल्याचे



दिसून येत आहे.

जुना झाल्यामुळे कमकुवत झाल्याने प्रवासी व जास्त जास्त वजनाची वाहतूक किंवा जास्त प्रमाणात लोक एकाच वेळी पुलावरुन गेल्याने पूल धडाधड वाजतोय अतिवृष्टी, पूर, भूकंप किंवा इतर नैसर्गिक आपत्तींमुळे पुलाला धोका निर्माण होऊ शकतो.? जर पुलाची नियमित देखभाल केली गेली नाही, तर तो लवकर खराब होऊ शकतो, असा अंदाज वर्तवला जातो मात्र पूल कोसळल्यास किंवा त्याचा काही भाग कोसळल्यास मोठे अपघात होऊ शकतात, ज्यात जीवितहानी आणि मालमत्तेचे नुकसान होऊ शकतो ? म्हणून गेवराई शहरासह यासह अन्य गावांना जोडणाऱ्या मुख्य मार्गावरील जुना जमादारचा पूल दूरवस्थेत आहे. पुलास असणारी संरक्षण कठडे अनेक ठिकाणी निघून पडली आहे. संरक्षण भिंत ही उखडून खराब झाले आहेत. त्यामुळे हे पुल वाहतुकीसाठी धोकादायक बनले आहे. तर रात्रीची स्थिती आणखी खराब होऊ नये म्हणून. बांधकाम विभागाने अनुसूचित घटना घडण्याची प्रतीक्षा न करिता या जुन्या पूलाची दुरूस्ती करणे आवश्यक बनले आहे.

गेवराई शहरातुन ग्रामीण भागास जोडणाऱ्या विद्रूपा नदीवरील जुन्या पुलाची अवस्था दयनीय झाली आहे. पुलावरुन वाहतूक करणाऱ्यांच्या सुरक्षेसाठी बसवलेल्या लोखंडी संरक्षक कठडे धोका निर्माण करणारे आहेत. या आधार असलेले सिमेंट पोलही उखडून पडले आहेत. त्यातच पूल संपल्यावर असणाऱ्या वळणावर झुडपे वाढली असून तेथे कोणत्याही प्रकारचा संरक्षक कठडा नसल्याने हे वळण अत्यंत धोकादायक बनले आहे. अशा स्थितित सध्या या पुलावरून वाहतूक सुरू आहे. अपघात होवून मोठी दुर्घटना घडण्यापूर्वी पूलाची दुरुस्ती करण्याची गरज असताना प्रशासन मात्र दुर्लक्ष करत असल्याने वाहनधारकांचा जीव धोक्यात आल्याचे दिसत आहे मार्गावरील गावांना जाणारी वाहतूक या जमादारच्या या जुन्या पुलावरून होते. तसेच येथूनच शहरात कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांची संख्याही मोठी आहे. परिणामी जुन्या पुलावर वाहतुकीची वर्दळ मोठ्या प्रमाणात असते. पुलाचे रुंदी जेमतेम असून येथून दोन्ही मार्गाने वाहतूक सुरू असते. त्यामुळे पुलास संरक्षण कठडा असणे गरजेचे आहे. बांधकाम विभागाने पुलाचे ऑडिट करून तात्काळ दुरुस्ती करावी, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज व्यापारी संघटनेच्या निवडी जाहीर

## अध्यक्षपदी गायके, कार्याध्यक्ष शेळके यांची निवड

धारुर । प्रतिनिधी

येथील छत्रपती शिवाजी महाराज व्यापारी संकुलातील व्यापाऱ्यांची बैठक होवून यात संघटनेची कार्यकारिणी निवडण्यात आली.





यात सर्वानुमते अध्यक्ष पदी यशवंत गायके तर उपाध्यक्ष पदी सय्यद शाकेर, कार्याध्यक्ष म्हणून सुरेश शेळके तर सचिव म्हणून तुकाराम शिनगारे यांची निवड करण्यात आली.

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज व्यापारी संकुलातील व्यापाऱ्यांनी दि.२३ बुधवारी बैठक घेवून व्यापारीबंधूच्या विविध समस्या व व्यापार वृध्दीच्या हेतून संघटना स्थापन करण्याचा निर्णय घेतला. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज व्यापारी संघटनेची पहिली कार्यकारिणीची सर्वानुमते घोषित करण्यात आली.

यात अध्यक्ष म्हणून माजी नगरसेवक यशवंत गायके, उपाध्यक्ष म्हणून पत्रकार सय्यद शाकेर, कार्याध्यक्ष म्हणून सामाजिक कार्यकर्ते सुरेश शेळके, सचिव म्हणून उद्योजक तुकाराम शिनगारे, कोषाध्यक्ष म्हणून नागनाथ गायके, सहसचिव म्हणून सुनिल खिल्लारे, सहकोषाध्यक्ष म्हणून प्रवीण धोतरे, सल्लागार म्हणून हनुमंत अंधारे, नितिन भैरे, दयानंद इंदुरकर यांची निवड करण्यात आली. बैठक कमलाकर इंदुरकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ब्रम्हगाव जयंती उत्सव समितीची कार्यकारणी जाहिर

## अध्यक्षपदी सुधाकर कांबळे तर उपाध्यक्षपदी अंशीराम कांबळे



माजलगाव । प्रतिनिधी

शहरापासुन जवळच असलेल्या ब्रम्हगाव येथे नुकतीच गावकर्यांच्या वतीने संयुक्त बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत सर्वानुमते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समितीची कार्यकारणी जाहिर करण्यात आली असुन अध्यक्षपदी सुधाकर कांबळे यांची तर उपाध्यक्षपदी अंशीराम कांबळे यांची निवड करण्यात आली आहे. यावेळी कॉंग्रेस पक्षाचे नेते तथा आंबेडकरी चळवळीचे सामाजिक कार्यकर्ते दत्ता कांबळे यांनी गुलाब पुष्पहार घालून अध्यक्ष व उपाध्यक्षसह सर्व सदस्य व कार्यकारणीचा सत्कार करून जंगी कार्यक्रम करण्यासाठी प्रोत्साहन दिले.

यावेळी ब्रम्हगाव येथे अण्णाभाऊ साठे जयंती विवीध सामाजिक उपक्रमाने साजरी करण्यात येणार असुन यामध्ये व्याख्यान, महिलांना साडी वाटप, जिल्हा परिषद शाळेला कॉम्प्युटर व प्रोजेक्टरची भेट, संविधान प्रतींचे वाटप असे विवीध उपक्रम होणार आहेत. यासाठी गावाच्या स्वखर्चाने जयंती साजरी होणार असुन इतरांना वर्गणी न मागण्याचा संकल्प करण्यात आला आहे.

जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी अध्यक्षपदी सुधाकर कांबळे यांची तर उपाध्यक्षपदी अंशीराम कांबळे, सचिव विठ्ठल कांबळे, अशोक कांबळे, श्रीमंत कांबळे, सहसचिव अंजन कांबळे, कोषाध्यक्ष दशरथ कांबळे, सदस्य बाबासाहेब कांबळे, भानुदास कांबळे यांच्या निवडी करण्यात आल्या तर अशोक कांबळे, मधुकर कांबळे, बंडू कांबळे, शिवाजी कांबळे, निलेश कांबळे सह गावकर्यांनी या सार्थ निवडीचे स्वागत केले.

# चिंचाळा येथे गायरान जमीनमध्ये होत असलेला सोलार प्रोजेक्ट मोजण्यासाठी महाराष्ट्र आधार सेनेने व गायरान धारकांनी केला विरोध





वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तहसीलचे कर्मचारी, भूमी अभिलेखचे, वीज कर्मचारी व पोलिस सोलार प्लांटसाठी आवश्यक असलेल्या जमिनीची मोजणी करण्यासाठी चिंचाळा येथे मंगळवारी दुपारी आले होते. ही मोजणी सुरू असतानाच चिंचाळा येथील काही गायरान धारक दत्ता आवाड, अण्णासाहेब आवाड, सुभाष आवाड, पप्पू आवाड, संतोष शेंडगे, विलास आव्हाड व महाराष्ट्र आधार सेनेचे वडवणी तालुका अध्यक्ष सतीश भाऊ हनवते महाराष्ट्र आधार सेना ऊसतोड कामगार उमेश भाऊ आवाड व महाराष्ट्र आधार सेनेचे कार्यकर्त्यांनी गायरान जमिनीमध्ये होत असलेला सोलर प्रोजेक्टला केला विरोध व त्यांना सांगितले की, दलित समाज गेल्या ४० वर्षांपासून गायरान जमीन कसत असून या जमिनीत आम्ही. पोटासाठी व लेकरांच्या शिक्षणासाठी जमीन पिकवतो. त्यामुळे शासनाने आमच्यावर अन्याय करू नये. गायरान जमिनीसाठी प आपले प्राण गमावले आहे. परंतु आता आम्ही शांत बसणार नाही ज्या गायरान जमिनीमध्ये आमच्या लेकरांचे भविष्य बघितलं आहे. त्यामुळे जर का शासनाने या गायरान जमिनीमध्ये तुलाही प्रोजेक्ट आणण्याचा प्रयत्न केला. तर आमचा जीव जरी गेला तरी हरकत नाही परंतु आम्ही. रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही. या जातीवादी सरकारला गोरगरीब दलित समाजाच्या मतदानावर निवडून यायला जमत आहे. परंतु या गायरान जमिनीमध्ये गोरगरीब दलित समाज आपलं पोट भरत असलेल जमत नाही. त्यामुळे सर्व मातंग समाजातील नेत्यांनी व गायरान धारकांनी शांत बसून जमणार नाही एकत्र येऊन आपल्या हक्कासाठी लढलं पाहिजे व रस्त्यावर उतरला पाहिजे. जोपर्यंत गायरान जमीन आपल्या नावाची होत नाही तोपर्यंत शांत बसायचं नाही. आपल्या ताब्यातील असलेली गायरान जमिनीचा एक तुकडा देखील शासनाला देणार नाहीत.

सतिश हानवते उमेश आवाड घटनास्थळी धाव घेत शासनाच्या अधिकारी याच्याशी चर्चा करत गायरान धारकांना न्याय मिळवून देण्यासाठी शासनाने सातबारा द्यावेत अशी मागणी केली व गायरान मोजणीला विरोध केला.

# राम फटाले यांच्या कुटुंबीयांना बीड शहर बचाव मंचाची सांत्वन भेट

## सावकारांना कठोर शासन व्हावे बीड शहर बचाव मंचाची कुटुंबीयांच्या वतीने मागणी

बीड । प्रतिनिधी

सावकारीच्या महाभयानक अत्याचारातून अनेक वर्ष होरपळून निघत असलेल्या सर्व फटाले



कुटुंबीयांची बीड शहर बचाव मंचाने काल भेट घेऊन सांत्वन केले. यावेळी मयत झालेले राम फटाले यांचे मोठे चुलते बीड शहरांतुन अनेक वर्षांपासून प्रदीर्घ काळ पत्रकारितेचे काम केलेले ज्येष्ठ पत्रकार द्वारकादास फटाले हेही आवर्जून उपस्थित होते.



यावेळी गेल्या अनेक वर्षापासून पेठ बीड, टकारवाडा भागातील महाभयानक, क्रूरतेचा कळस असलेल्या व महाअत्याचारी सावकार कुटुंबीयांच्या जाळ्यात कशा पद्धतीने अडकत गेलोत व त्यांनी अनेक वर्षांपासून कशा पद्धतीने शोषण केले.

अनेक वेळेस राम फटाले यांना व्याजाच्या पैशापोटी दिवस दिवस सावकार घरात कोंडून ठेवून मारहाण करत राहिले, हा सगळा घडलेला प्रकार त्यांचे वडील, चुलते व भाऊ यांनी सविस्तर सांगितला. २०२१ –२२ च्या लॉकडाऊन काळातही या क्रूर सावकाराला मुद्दल व्याजासह पैशाची परतफेड करूनही तारण ठेवलेले चेक, बॉण्ड्स इतर कागदपत्रे हा परत देत नव्हता व आज पर्यंत परत दिलेली नाहीत. सतत व्याजाच्या पैशासाठी राम फाटले यांच्या घरातील महिलांना शिवीगाळ करणे घाणेरड्या अर्वाच्च भाषेमध्ये क्रूरपणे नाही नाही त्या माणुसकीला काळीमा फासणाऱ्या धमक्या देणे, आपण इथे लिहू शकणार नाही असे शब्द वापरून सतत उत्पिडन चालू होते. गेल्या सात वर्षांपासून चाललेल्या ह्या अत्याचारीत जीवनाला कंटाळून राम फाटले यांनी आपली जीवन यात्रा आत्महत्या करून संपवली. यावेळी फटाले कुटुंबीयांना बीड शहर बचाव मंचाने आम्ही तुमच्या पाठीशी तुम्हाला न्याय मिळेल पर्यंत खंबीरपणे उभे आहोत,अशी भूमिका मांडली. बीड शहर बचाव मंचाचे कायदेशीर सल्लागार ड.अनिलजी बारगजे यांनी या कुटुंबीयांचे वकीलपत्र एक रुपया न घेता स्वखर्चाने स्वीकारले आहे. कुटुंबीयांना न्याय मिळेपर्यंत बीड शहर बचाव मंच त्यांच्यासोबत उभे आहे असे सर्व पदाधिकाऱ्यांनी सांगितले आहे. तरी पोलीस विभागाने याचा सखोल व योग्य पद्धतीने तपास करावा कुठल्याही मोठ्या नेत्यां पुढार्यांनी मताच्या राजकारणासाठी आजवर केल्याप्रमाणे आता याला पाठीशी घालू नये अशी मागणी फटाले कुटुंबीयांच्या वतीने यावेळी उपस्थित असलेले बीड शहर बचाव मंचाचे अध्यक्ष नितीनजी जायभाये,आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष अशोकराव येडे, इंटक कॉंग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष रामधन जमाले, बचाव मंचचे मार्गदर्शक सुधीरभाऊ देशमुख, संपादक पत्रकार बालाजी जगतकर आदी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी केली आहे.

# कुरेशी समाजाला न्याय व मागण्या मान्य होत नाही तो पर्यत बीड जिल्ह्यातील सर्व चिकन मटन व पशू हत्या बंद : मुस्ताक कुरेशी

माजलगाव । प्रतिनिधी

महाराष्ट्र मध्ये कुरेशी समाजाने पशू खरेदी विक्री बंद पुकारले कुरेशी समाजाला काही गुंडे तर्फे त्याच्या वाहने अडवण्याचा प्रयत्न करणे जनावरे लुटणे तसेच त्यांच्यावर खोटे गुन्हे दाखल करणे माहित नसताना पण त्यांना तुम्ही जनावरे कत्तलीसाठी घेऊन जात आहे असे आरोप लाऊन मारहाण करणे असे घटना सारखे कुठे ना कुठे घडत आहे तसेच पोलीस प्रशासन तर्फे मदत मिळत नाही व्यापारी वर गुन्हे दाखल होत आहे व प्रशासननी मोका हा कायदा मंजूर केला असल्याने आज व्यापार करणे अवघड झाले आहेत.

जर जनवारे कत्तल करणे व वाहतूक करणे व्यापर करणे असे अवघड झाल्यामुळे कुरेशी समाजानी बंद पुकारले आहेत तर बीड जिल्ह्यातील सर्व चिकन मटन व पशू हत्या वर तात्काळ बंद करावे. जो पर्यत कुरेशी समाजाला न्याय मिळत नाही व मोका कायदे रद्द करण्यात येत नाही तो पर्यंत चिकन मटन व पशू हत्या बंद करण्यात यावे. आज शेतकरी यांना जनवारे बाजारात घेऊन जाण्यासाठी भितीचे वातावरण निर्माण झाले काही गुंडे रस्त्यावर थांबा ऊन वाहने अडवण्यात येते मग त्या वाहवत जनवारे सोडून गोशाळेत टाकुन देत आहे असे घटना घडत आहेत.

**जमियतुल कुरेशी समाजाचा अन्यायाविरुद्धचा प्रखर लढा!**

कुरेशी समाजाने महाराष्ट्र मध्ये पुकारलेले पशु खरेदी–विक्री बंद आंदोलन हा केवळ एक व्यवसाय थांबवण्याचा निर्णय नाही, तर त्यांच्यावर होणाऱ्या अमानुष हल्ल्यांविरुद्ध,



खोट्या आणि मनमानी केसेसविरुद्ध, तसेच वर्षानुवर्षे सुरू असलेल्या घोर अन्यायाविरुद्ध पुकारलेला हा एक प्रखर आणि निर्णायक लढा आहे. हा 'बायकॉट' केवळ तात्पुरता बंद नसून, आपल्या हक्कांसाठी आणि सन्मानासाठी दिलेला हा एक अस्तित्वाचा लढा आहे, जो आता अधिक तीव्र आणि प्रभावीपणे लढला जाईल!

अन्यायाची परिसीमा: सहनशीलतेचा अंत! गेली अनेक वर्षे कुरेशी समाज शांतताप्रियपणे आपला पारंपरिक पशुधन व्यवसायात कार्यरत आहे. मात्र, 'गोरक्षणा'च्या नावाखाली काही समाजकंटकांकडून त्यांच्यावर होणारे अमानुष हल्ले, जीवघेणी मारहाण आणि वाहनांची जाळपोळ हे आता नित्याचे झाले आहे. इतकेच नाही, तर त्यांना कायद्याच्या कचाट्यात ओढण्यासाठी बिनबुडाचे आणि खोटे गुन्हे दाखल केले जात आहेत. यामुळे त्यांचे जीवन आणि उपजीविका दोन्ही धोक्यात आले आहे. कुटुंबाचे पोट भरणेही मुश्कील झाले आहे. या अन्यायाने आता सहनशीलतेचा अंत झाला आहे. कुरेशी समाज आता या अन्यायाविरुद्ध एकजुटीने उभा राहिला आहे!

**'बायकॉट'ची वज्रमुठ: व्यवस्थेला हादरवणारी शक्ती!**

हा 'बायकॉट' म्हणजे केवळ एक व्यावसायिक निर्णय नाही, तर तो व्यवस्थेला हादरवून सोडण्याची वज्रमुठ आहे. जेव्हा हजारो वर्षांचा पारंपरिक व्यवसाय करणारा एक मोठा कुरेशी समाज असून पशुधन खरेदी–विक्री, मांस उद्योग आणि यावर अवलंबून असलेले हजारो कोटींचे व्यवहार ठप्प झाला असून राज्याच्या आणि देशाच्या अर्थव्यवस्थेवर याचा गंभीर परिणाम होईल, आत्मसन्मानाची मशाल: हा 'बायकॉट' म्हणजे आत्मसन्मानाची मशाल आहे. आपल्या हक्कांसाठी, आपल्या सुरक्षिततेसाठी आणि न्यायासाठी लढण्याची प्रेरणा यातून मिळेल. हा लढा केवळ कुरेशी समाजाचा नाही, तर हा न्याय आणि समानतेच्या तत्त्वांचा लढा आहे.

**आता निर्णायक लढ्याची वेळ!**

कुरेशी समाजाचे हे आंदोलन आता केवळ व्यवसाय बंद ठेवण्यापुरते मर्यादित राहणार नाही, तर ते न्याय मिळेपर्यंत आणि अन्यायाची पाळेमुळे समूळ उपटून टाकेपर्यंत सुरू राहील. प्रत्येक हल्लेखोर आणि खोटे गुन्हे दाखल करणाऱ्यांवर कठोर कारवाई झालीच पाहिजे. कुरेशी समाजाला सन्मानाने, निर्भयपणे आणि सुरक्षितपणे आपला व्यवसाय करण्याचा कायदेशीर अधिकार मिळालाच पाहिजे तो पर्यंत न्याय मिळत नाही तो पर्यंत बीड जिल्ह्यातील सर्व चिकन मटन व पशू हत्या बंद करण्यात यावे. कुरेशी समाजाला न्याय मिळत नाही तो पर्यत बीड जिल्ह्यातील सर्व चिकन मटन व पशू हत्या बंद करण्यात यावे.नसता लोकशाही मार्गाने विविध स्वरूपाचे आंदोलन पुकारले जाईल अशी मागणी जिल्हाधिकारी याच्या कडे ईमेल व्दारे महाराष्ट्र युवक प्रतिष्ठान च्या वतीने करण्यात आली आहे

# वडगाव गुंदा येथील विद्यार्थ्यांकडून व्हिडिओ कॉलद्वारे पंकजाताई मुंडे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा

## सेवा पंधरवडा उपक्रमांतर्गत शालेय साहित्य वाटप व वृक्षारोपण : गणेश लांडे

बीड । प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री मा. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त साजरा होत असलेल्या सेवा पंधरवडा अंतर्गत आज वडगाव गुंदा (ता. बीड) येथे एक विशेष आणि लक्षवेधी क्षण पाहायला मिळाला. गावातील विद्यार्थ्यांनी पंकजाताईंना व्हिडिओ कॉलद्वारे थेट वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या, आणि त्या क्षणाचा आनंद सर्वत्र दिसून आला.

या कार्यक्रमात गणेश लांडे यांच्या पुढाकाराने विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. वह्या, पेन, पुस्तके अशा उपयुक्त वस्तूंनी विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवला. शिक्षणाला प्रोत्साहन देणाऱ्या या उपक्रमाचे गावकऱ्यांनी विशेष स्वागत केले. पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या प्रेरणेतून गावात वृक्षारोपण करण्यात आले. लावलेल्या झाडांचे संगोपन करण्याचे वचन उपस्थितांनी दिले. हा उपक्रम भविष्यासाठी हरित योगदान ठरणार आहे.

या कार्यक्रमाला भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष मनोज काका पाटील हे प्रमुख उपस्थित होते. त्यांच्यासोबत सरपंच सुधाकर बापू नागरगोजे, उपसरपंच सुमंत नाना गव्हाणे तसेच समस्त गावकरी उपस्थित होते. फ्लेक्स, पोस्टर किंवा जाहिरातबाजी न करता, लोकसेवेच्या कार्यातून वाढदिवस साजरा करण्याचा हा विधायक मार्ग ग्रामस्थांसाठी प्रेरणादायी ठरला. गणेश लांडे यांनी यशस्वी आयोजन करत पंकजाताईंच्या विचारांना कृतीतून साकार केले.



# मनोरंजनार्थ क्लब च्या नावाखाली अवैध पत्त्यांचे क्लब हप्ते घेऊन सुरु

## दोन नंबर च्या धंद्याला पैसे घेऊन एक नंबर परवाना; उपविभागीय पोलीस अधिकारी आणि ठाणे प्रमुख यांची मुख संमती

## एस पी साहेब आपण कितीही कायदे कडक करा; तालुका आणि ग्रामीण चे अधिकारी भ्रष्ट कामाकडे कानाडोळा

तलवाडा । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील गुन्हेगारी कमी व्हावी या भावनेतून नव्याने रुजू झालेले पोलिस अधीक्षक नवनीत कावत यांनी कडक पावले उचलले आहेत. नवनवीन नियम आणि कायदे त्यांनी अंमलात आणली ही सामान्य जनतेच्या आणि लोकांच्या हिताची आहेत परंतु या नियमाची अंमलबजावणी ग्रामीण भागातील पोलिस अधिकारी आणि कर्मचारी करत नसल्याने आजही अवैध्य धंद्यांना पाठबळ मिळत आहे. यामध्ये अवैध्य दारू विक्री, गुटखा विक्री, अवैध्य वाहतूक, अवजड वाहतूक यांच्या अवैध्य धंद्याचा समावेश होत असून विना परवाना चालत नसलेले पत्त्याचे क्लब हे मनोरंजनाच्या नावाखाली आज जिल्ह्यात सर्रास सुरू झाले असून हे पोलिस स्टेशन, उपविभागीय पोलीस अधिकारी, एल सी बी यांना हप्ते देऊन चालवण्यात येतात हे खात्री लायक आहे. याकडे पोलिस प्रशासन अर्थपूर्ण दुर्लक्ष करत असल्याने गाव गुंडांना पाठबळ मिळते आणि यातून कायदा आणि सुव्यवस्था बिघडते हे नक्की.

जिल्ह्यात केज प्रकरण इतके गाजले की जिल्हा बीड आहे का बिहार हेच समजले नाही, सरपंचाची हत्या झाल्या नंतर जिल्ह्यातील कायदा आणि सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी छत्रपती संभाजी नगर येथील नवनीत कावत यांची पोलिस अधीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली त्यांनी जिल्ह्यात गुन्हेगारी रोखण्यासाठी ठोस पावलेले उचलले, गुन्हेगारांना शिक्षा व्हावी, जनतेमध्ये कायद्याचा धाक रहावा, विनाकारण जनतेला त्रास होता काम नये अशी भूमिका घेतली ती आजही आहे. अवैध धंदे बंद करून जिल्ह्याची प्रतिमा मलिन होण्यापासून वाचवण्याचा प्रयत्न पोलिस अधीक्षक यांचा आहे परंतु आजही अवैध धंदे छुप्या मार्गाने सुरू आहेत आणि याला कारणीभूत स्थानिक पोलिस प्रशासनातील अधिकारी आणि कर्मचारी आहेत हे नाकारता येणार नाही. त्यांनी जर ठरवले तर कोणताही अवैध धंदा सुरू राहू शकत नाही हे खरं आहे पण असे होताना दिसत नाही, आजही सर्व अवैध धंदे बिनबोबाट सुरू आहेत आणि हे धंदे स्थानिक पोलिस अधिकारी आणि कर्मचारी यांच्या संगनमताने सुरू असल्याचे दिसून येते. सध्या अवैध धंद्यामध्ये मनोरंजनाच्या नावाखाली पत्त्यांचे क्लब सर्रास सुरू आहेत.याठिकाणी मनोरंजन करण्यात येते असे दाखवण्यात जरी येत असले तरी येथे पैशाने जुगार होतो हे सर्वांना माहीत आहे.हे मनोरंजनाच्या क्लब कोणत्या नियम आणि अटीचा अधीन राहून सुरू करण्यात येतात, आणि राहू शकतात याची कल्पना कदाचित पोलिस अधिकारी आणि कर्मचारी यांना नसावी त्या मुळे हप्ते घेऊन याला परवानगी देतात ही शोकांतिका आहे. आणि हेच हप्ते देणारे आम्ही किती प्रामाणिक आहोत असे ववरुण आमचे कोणीच काही करू शकत नाहीत असे वागतात.परंतु याठिकाणी मनोरंजन न होता जुगार होतो आणि याच ठिकाणी चार चार जण मिळून पार्टनर राहून कोणते मनोरंजन करतात हे पोलिस अधिकारी आणि कर्मचारी यांना कळत नाही का ,असा प्रश्न निर्माण होतो? याबाबत याआधी ही बंद करण्यात यावे अशी मागणी करण्यात आली होती परंतु दोन तीन दिवस बंद करून हप्ते वाढवून घेऊन या बिनबोभाट क्लब ला पोलिस प्रशासन आणि उपविभाग पोलिस अधिकारी तसेच एल सी बी यांच्याकडून मुख संमती देण्यात आल्याने पुन्हा हे क्लब सुरू झाले आहेत.हे अनधिकृत कोणत्याही नियमाला धरून न चालणारे क्लब पोलिस अधीक्षक बंद करतील का हे पहावे लागेल. यावर पोलिस प्रशासन ने ठोस पावले उचलली नाही तर जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे लेखी निवेदन देवून कार्यवाही करण्याची मागणी करण्यात येईल असे एक सामाजिक संघटनेच्या सदस्यांनी सांगितल्याने आता हे क्लब बंद होतात का याकडे पाहावे लागेल.



# कुटे-बडे वस्ती पर्यंतचा शेतरस्ता महसुली दप्तरात नोंद होणार

शिरूर । प्रतिनिधी

मौ.हिवरसिंगा पासुन दक्षिणोत्तर असणारा नदीतटा लगतचा पारंपारिक वहिवाटीस असणारा शेतरस्ता महसुली दप्तरातील व गाव नकाशावरील प्रमाणित नसल्यामुळे येणाऱ्या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी शिवराम राऊत (शिवश्री कृषी मंडळ) व पिडीत ग्रामस्थांच्या वतीने अनेक वर्षापासुन संघर्ष चालू होता. त्यास ग्राम रस्ता समिती हिवरसिंगा यांच्या माध्यमातून शहादेव सानप (मंडळ अधिकारी), गणेश बडे (तलाठी), दत्तात्रय शिंदे (मा.सरपंच), ज्ञानोबा शिंदे (उपाध्यक्ष तंटामुक्त समिती) सह श्रीधर सानप, प्रल्हाद सानप, शाम दुधाळ, अभिजित सानप, अशोक कुटे, सावता दुधाळ, विश्वनाथ बडे या पंचा समक्ष हिवरसिंगा नदी ते देवकर, नांगरे, दुधाळ, सानप वस्ती, शिंदेवस्ती, कुटे-बडे वस्ती (कानिफनाथ नगर) पर्यंतचा प्रचलित व पारंपारिक शेतरस्ता प्रत्यक्ष जायमोका पाहणी करण्यात आली.

यामध्ये नदीतटा लगत आसणारे गट नं. ची पडताळणी करुन इतर हक्कात नोंद करून भूमी अभिलेख प्रशासनाच्या गाव नकाशात प्रमाणिकरण करण्यासाठी आवश्यक त्या बाबी पूर्ण करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. या नोंदी अभावी शेत रस्ता विकास करणे शक्य होत नसल्याने वस्ती रहिवासी आसणारे शेतकरी यांना आपले शेतीची कामे, औजारे, खते बियाणे यांची वहिवाटीत समस्या प्रमाणेच विद्यार्थी, रूग्ण, शेतमजूर, जवळपास ६०% रहिवाश्यांचा रस्ताअभावी अनेक समस्यांचा सामना करावा लागत होता. यामुळे शेत रस्ता महसुली दप्तरात नोंदीसाठी शेतकऱ्यांच्या मागणीस्तव स्थळपाहणी संपन्न झाली आहे.

यावेळी नवनाथ बडे, लखन कुटे, बाजिराव बडे, अंकुश कुटे, बाबुराव कुटे, सर्जेराव कुटे, बाळू कुटे, विष्णू शिंदे, कृष्णा शिंदे, किसन कुटे, जालिंदर राऊत, सतिष कुटे, मुकिंद बडे, अशोक शिंदे, बळिराम शिंदे, प्रल्हाद शिंदे, सोनलाल सानप सह परिसरातील शेतकरी यांची उपस्थिती होती. या रस्ता नोंदीची पुढील प्रक्रिया लवकरच पूर्ण करणार असल्याचे महसुली विभागाणे दिले आहे.

# केजमध्ये आवादा कंपनीच्या मनमानी कारभारा विरोधात शेतकऱ्यांचे आमरण उपोषण सुरु

केज । प्रतिनिधी

गेल्या वर्षभरापासून वादग्रस्त ठरलेल्या आवादा कंपनीच्या मनमानी कारभाराविरोधात केज येथील शेतकरी गुरुवार दि.२४ जुलै २०२५ रोजी तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसले आहेत. याबाबत सविस्तर माहिती अशी की, केज परिसरात सर्वे नंबर १७६ मधील शेतकऱ्यांना आवादा कंपनीचे कर्मचारी पूर्वी झालेल्या सर्वे प्रमाणे काम न करता गावगुंडांना हाताशी धरून बेकायदेशीररित्या शेतामध्ये विद्युत पोल रोवण्याचा प्रयत्न करत आहेत. शेतकऱ्यांनी विरोध केल्यानंतर शेतकऱ्यांना धमक्या दिल्या जात आहेत. या प्रकाराने शेतकरी भयभीत झाले आहेत.



सर्वे नंबर १७६ मध्ये शेतकऱ्यांची राहते पत्र्यांची घरे आहेत, येथील शेतकऱ्यांचा उदरनिर्वाह शेतीवर अवलंबून आहे, सदर विद्युत पोल रोवले तर शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होईल व उपासमारीची वेळ येईल. कंपनीच्या विरोधात प्रशासन कुठलीही कारवाई करत नाही, असे उपोषकर्त्यांचे म्हणणे आहे, कंपनीचा मनमानी कारभार थांबवावा व मूळ सर्वेक्षण झालेल्या मार्गाने विद्युत जोडावेत. शेतकऱ्यांना केली जाणारी दमदाटी व होणारा अन्याय थांबवावा.

या मागणीसाठी शेतकरी रेणुका सूर्यकांत तेलंग, संगीता बलभीम तेलंग, सविता संतराम भोसले, स्वाती पांडुरंग भोसले, कमल शिवाजी वनवे, मीरा गोरख थोरात, मेघराज भोसले, सूर्यकांत तेलंग, गोरख थोरात, अशोक भोसले, संतराम भोसले, मारुती भोसले, पांडुरंग भोसले, बलभीम तेलंग, उपोषणास बसले आहेत. शेतकऱ्यांच्या या मागण्या प्रशासनाने तातडीने मार्गी लावाव्यात अन्यथा रस्त्यावर उतरून आंदोलन करण्यात येईल, असा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.

# वडवणी शहरात शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थीनींना त्रास देणाऱ्या रोड रोडरोमिओचा बंदोबस्त करावा : महादेव सावंत

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी शहरात तालुक्यातील ग्रामीण भागातून शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थिनी, मुली या शिक्षण घेण्यासाठी येतात तरी शहरातील महाविद्यालय, शाळा, क्लासेस बसस्थानक येथे विद्यार्थिनींना नशेमध्ये असणाऱ्या रोडरोमिओ तरुणाकडून त्रास देण्यात येतो तरी मुलींना त्रास देणाऱ्या अशा रोडरोमियोवर नजर ठेवुन कठोर कारवाई करण्याची मागणी पोलीस निरीक्षक वडवणी यांना काल बुधवार रोजी दिलेल्या लेखी निवेदनाद्वारे भाजपचे वडवणी तालुका उपाध्यक्ष महादेवराव सावंत व इतर पालकांनी केली आहे.




वडवणी हे तालुक्याचे ठिकाण असून या ठिकाणी शिक्षणासाठी तालुक्यातील ग्रामीण भागातील शालेय व महाविद्यालयीन मुली या ये जा करतात तरी शहरातील शाळा, महाविद्यालये, क्लासेस, बस स्थानक येथे अनेक नशेमध्ये असणारे रोडरोमिओ तरुन हे विद्यार्थीनीची छेडछाड करतात तसेच अश्लिल हावभाव भाषा वापरुन त्रास देतात यामुळे अनेक मुलींनी आपले शिक्षण बंद केलेले आहेत. तरी शहरातील माहाराणी ताराबाई माध्यमिक विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय, बसस्थानक, क्लासेस या ठिकाणी चिडीमार पथकाची स्थापना करुन गस्त घालून अशा त्रास देणाऱ्या रोड रोमियांना ताब्यात घेवून कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी व रोडरोमिओचा बंदोबस्त करण्यात यावा नसता भारतीय जनता पार्टीच्या वतिने पालक विद्यार्थीनीना सोबत घेवून लोकशाही मार्गाने अंदोलन करण्यात येईल, असा इशारा पोलीस उपनिरीक्षक वडवणी यांना दिलेल्या लेखी निवेदनाद्वारे भाजपचे वडवणी तालुका उपाध्यक्ष महादेव सावंत, युवा नेते विश्वनाथ मुजमुले, राज आंधळे, भरत माने, तात्या मुजमुले, बबन खळगे, आंप्पासाहेब आंधळे, आनील नेहरकर, रंजीत जाधव, अमोल पांचाळ, संतोष शिदेंसह तालुक्यातील पालक, कार्यकर्ते यांनी दिला आहे.

या निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणविस, ना. पंकजाताई मुंडे, पर्यावरण व पशुसवर्धन मंत्री, हंसराज अहिर, ओ.बी.सी. आणि मागासवर्गीय आयोग भारत सरकार, आ. प्रकाश दादा सोळंके, पोलीस अधिक्षक बीड, उपविभागीय अधिकारी, उप विभाग माजलगांव यांना पाठविण्यात आले आहेत.

# आठवडी बाजाराकडे जाणाऱ्या रस्त्याची दयनिय अवस्था

धारूर । प्रतिनिधी

केजला जाणारा मुख्य रोड ते आठवडी बाजारात जाणारा मिलपुढील रस्त्याची खूप वाईट परिस्थिती आहे. सोमवार व शुक्रवार या दिवशी बाजारासाठी हजारो लोक आपल्या गाडीवर भाजीपाला घेऊन जातात. अनेक विद्यार्थी शाळा कॉलेजला सायकल मोटरसायकलवर जातात जाताना त्यांना या रस्त्याचा खूप बिकट परिस्थितीमध्ये सामना करावा लागत आहे.



दररोज दहा ते पंधरा मोटरसायकल वाले व सायकल वाले या ठिकाणी चिखलाचा सामना करताना पडत आहेत. रोज सकाळी पहाटे अनेक वृद्ध महिला पुरुष या रस्त्याने फिरायला जातात. अनेक लोकांच्या अंगावर गाडी जात असताना चिखल उडला जात असुन अनेक आबालवृध्द या रस्त्यावर पडत आहेत. सध्या धारूर मध्ये मेन रस्त्याचे काम चालू असल्यामुळे सर्व वाहतूक याच रस्त्याने चालू असल्यामुळे सर्व धारूरवाशीयांना या रस्त्याचा व बिकट परिस्थितीचा सामना करावा लागत आहे. या रस्तावर मुरुम टाकून दबयी करून घ्यावी अशी मागणी नागरीक करत आहेत.

# गेवराई नगरपालिकेला कधी जाग येणार : अश्विन जवंजाळ

## पिकअप थेट मोठ्या नाल्यात उलटले

गेवराई । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात परतीच्या पावसाने धुमशान घातले आहे. ठिकठिकाणी मुसळधार पावसामुळे पाणीच पाणी साचले आहे. मोठ्या नाल्यांमुळे पाण्याचा अंदाज न आल्याने पिकअप उलटले गेल्याची घटना दि.२५ जुलै रोजी दुपारी घडली. सुदैवाने या दुर्घटनेमध्ये कोणाला जिवीत हानी झाली नाही तसेच गेवराई शहरात जोरदार पाऊस असल्याने शहरातील संपूर्ण नाल्या व रस्ते पाण्याने ओसडून वाहू लागले आहेत. शहरातील मुख्य वस्तीत असलेले मोंढा भाग परिसरात ज्योति क्रांती मल्टीस्टेटच्या समोर एक मोठा नाला बांधण्यात आलेला आहे मात्र या नाल्याचा अंदाज न आल्यामुळे पिकअप चालकाला गाडीचा तोल संभाळता आला नाही आणि थेट गाडी त्या नाल्यामध्ये उलटली रस्ता छोटा झाला मोठा अशा स्थितीत रस्ता असल्यामुळे येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांना अडथळा ठरत आहे.

पिकअप मोठ्या नाल्यावर म्हणजेच पिकअप गाडी नाल्याच्या पाण्यातून किंवा पाण्याच्या जवळून जाण्याचा प्रयत्न करत आहे. हे धोकादायक असू शकते, कारण नाल्याचे पाणी कधीकधी खूप खोल असू शकते आणि गाडी अडकू शकते? याचा अंदाज चालकाला आलाच नसल्यामुळे गाडी नाल्यात गेल्यावर परिसरात खळबळ उडाली असून मात्र त्या नाल्यात तुडुंब असे पाणी साचले आहे. त्या पाण्याला बाहेर निघण्यासाठी पुढे कुठेही वाट नसल्यामुळे ते पाणी तिथेच अडकून बसत आहे. याकडे गेवराई नगरपरिषद स्वच्छता विभागाचे दुर्लक्ष पाहायला मिळते लोकांच्या जीवावर बेदण्यासारखे काम न.प. प्रशासन करत असल्याचे पाहायला मिळाले. याबाबत गेवराई नगरपालिकेला कधी जाग येणार असा संतप्त प्रतिक्रिया युवा नेते अश्विन जवंजाळ यांनी व्यक्त केली आहे.



# गायरान धारकांचे तीव्र आंदोलन होणार : धम्मपाल कांडेकर

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तसेच गेवराई शहरातील गायरान धारकांची व्यापक बैठकीचे आयोजन पॅंथर्स रिपाइं चे युवा प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष धम्मपाल कांडेकर यांच्या अध्यक्षतेखालील संपन्न झाली. या वेळी बैठकीत बोलताना युवा प्रदेशाध्यक्ष धम्मपाल कांडेकर म्हणाले कि, राज्यात तसेच गेवराई तालुक्यातील गायरान प्रश्नी मोठ्या स्वरुपाचे आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला.

शासनाच्या २८/११/१९९१ च्या जि आर ची अमलबजावणी करण्यात यावी तसेच गेवराई तालुक्यातील गायरान धारकांना घरकुल देण्यात यावे गायरान धारकांचे पिक पंचनामे करण्यात यावे या सह विविध विषयावर या बैठकीत चर्चा करण्यात आली. या वेळी गायरान धारकांनीही आपले आपले मत व्यक्त केले. या बैठकीला गायरान धारक, सोनाबाई कांडेकर, सोनाबाई सौंदरमल, सुबाबाई वक्ते जयश्री मनोहर नाडे, आई पाटोळे, आई युवा नेते धम्मपाल भोले, योगीराज शिंदे, सुरेश कांडेकर, सुनिल कांडेकर, डि यु कांडेकर, यमराज सौंदरमल, भांगे दादा, विजय सांळुखे, ईमरान भाई, सुरेश कारके, जाधव मामा, संतोष बांगर, सुभाष सौंदरमल, गोपीनाथ भोले, सोमनाथ पाटोळे, बाबुराव कांबळे, आकाश जाधव, रामभाऊ भोले, अजहर भई, कृष्णा भालेराव, बंन्डु शिंदे, सुधाकर केदार, माटे मामा, बाबुराव साबळे, बाबा दाभाडे, कारके दादा, सिराज भाई, तुरुकमारे दादा यांच्यासह पदअधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते तर या बैठकीचे आभार प्रदर्शन बाबुराव साबळे यांनी मानले.

# शेतीच्या वादातून घडलेला प्रकार सिरसाळा पोलीसाचा थेट बांधावर जाऊन निपटरा

सिरसाळा / प्रतिनिधी

सिरसाळा परिसरातील मान्सूनपुर्व कालावधीत शेतकरी मशागतीच्या कामात व्यस्त असताना जमिनीच्या मालकी हक्कावरून अनेकदा शेतकऱ्यांमध्ये वाद निर्माण होतात. मोजे वाका या ठिकाणी भावा भावाच्या शेतीच्या वादातून बांधावरून दोघा मध्ये वाद निर्माण होत होता पण यावेळी सिरसाळा पोलीसानी योग्यवेळी दोन्ही भावाची समजुत घातली व वाद मिटवला गेला आहे.

ही बाब लक्षात घेऊन बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी पोलीस आपल्या बांधावर हा अभिनव उपक्रमाच्या अनुषंगाने सिरसाळा ठाण्याचे कर्तव्य दक्ष पोलीस निरीक्षक गोरखनाथ दहिफळे यांनी शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन शेतकऱ्यांचा प्रश्न निकाली लावून या उपक्रमाची सुरुवात केल्याने सर्वत्र या उपक्रमाचे स्वागत होत आहे. बीड जिल्ह्याचे पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांनी पोलीस आपल्या बांधावर शेतकऱ्यांच्या हिताचा उपक्रम सुरू करून एक वाद होण्या अगोदर वाद आपसात मिटवण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमामुळे शेत जमिनीशी संबंधित वाद निर्माण होताच पोलीस यंत्रणा तात्काळ सजग होऊन त्या वादात सामंजस्य व कायदेशीर मार्गदर्शनाच्या आधारे मार्ग काढण्याच्या प्रयत्न करणार आहेत. पोलीस अधिकारी यांनी तक्रारदाराशी संवाद साधून खात्री करण्याचे निर्देश दिले आहेत. या पार्श्वभूमीवर सिरसाळा पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक गोरखनाथ दहिफळे यांना कळाल्यानंतर त्यांनी प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन संबंधित विषयाची माहिती घेऊन संबंधित शेतकऱ्यांचा वाद होऊ नये व नुस्कान ही होऊ नये व बांधाचा मार्ग सुरळीत व्हावा यासाठी तेथील शेतकऱ्याला बोलावून बांधाच्या कडेला बांध काढून दिला आहे. यासाठी सिरसाळा पोलीस ठाण्याचे बीट अंमलदार शेंगुळे साहेब व घोळवे साहेब यांनी थेट बांधावर जाऊन बांधाचा प्रश्न निपटारा करून योग्य ते मार्ग काढून दिला आहे. त्यावेळी गावातील उपस्थित ग्रामस्थ वाक्याचे सरपंच व नागरिक मोठ्या प्रमाणात होते. त्यांच्यासमोर दोन्ही भावाचा प्रश्न मिटला असं लेखी स्वरुपात घेण्यात आले आहे.



हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT